# मुपीकर

## एक मुक्त व्यासपीठ




शेती व तंत्रज्ञान



उद्योग व व्यापार



युवा पिढी व चर्चा



इतिहास व परंपरा



**जंगल का क़ानून :-** संदेश मांजरेकर

**पाकिस्तानमधील अराजकाची बीजे कशात ? :-** सुधीर काळे, जकार्ता

**चाळीशी** :- मीनल दफ्तरदार

**हे मृत्यो...** :- अभिजित थिटे

**निकालाचा शोध... :-** अभिषेक चौधरी

**काही चारोळ्या** :- रोहित कुलकर्णी

---

**पाऊस :-** कल्पी जोशी

**एक किनारा** .......!! **:-** माया कुलकर्णी

**मसीहा :-** अशुतोष मोहरीर

**मायी माय आन त्याची मम्मी :-** सुनील जोशी

**थर्ड आय :-** विनायक पाचलग

-

# जंगल का क़ानून"

संदेश मांजरेकर

जेव्हा मी आई बाबांना माझा निर्णय सांगितला तेव्हा बाबा काहिसे नाराजच झाले .खरतर उगीचच त्यांना माझा निर्णय अयोग्य वाटला. आईला मात्र माझ म्हणणं पटलं ती तशी काळाच्या बरोबरीने वागणारी बाई होती. मला दूसरी नोकरी मिळाल्यामुळे मी सध्याची नोकरी सोडणार होतो. हाच माझा निर्णय मी आइबाबांना आज सांगितला होता. आई बाबांना सम्जावत म्हणाली अहो मान्य आहे पण हल्ली पुरवीसारखा काळ राहिलेला नाही. मुलांना आणखी पुढे जायचं असतं, पोष्टटही चांगली मिळते आणी पगारही वाढतो, वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी काम करून कंटाळा तर येतोच पण खरा त्रास तेव्हा होतो जेव्हा आपल्याला गृहीत धरलं जातं! आई अगदी परफेक्ट बोललीस मी आइचं बोलणं उचलून धरत म्हणालो. आपण टेक इट फॉर ग्रांटेड धरले जातो आणी त्याचाच खूप त्रास होतो. वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी नोकरी केलेल्या बाबांना ते फारसं पटलं नाही. पण त्यांनी आम्हाला कधीच कुठल्या गोष्टीला अडवलं नव्हतं

लवकरच नवीन ठिकाणी मी रुजू झालो, नवीन ठीकाणचं वातावरणही खूप छान होत. मुख्य म्हणजे माझ्यावरती फ़क्त दोनच बॉस होते एक कम्पनीचे डायरेक्टर आणी एक आमचे जनरल मेनेजर मि. व्हार्गिस. थोड्याच अवधीत मी बॉसच्या विश्वासास पात्र ठरलो. मि. व्हर्गीसही मला खूप मदत करत तेही माझ्या कामावर खुश होते. हळूहळू बॉसने माझ्या कामाचा आवाका वाढवायला सुरुवात केली. अर्थात मलाही आव्हानं स्वीकारायची आवड असल्यामुळे मी आवडीने नवीन काम करू लागलो पण त्यामूळे माझ्या शत्रून्ची संख्या वाढू लागली अर्थात असे हित्शात्रू थोडेसेच होते आणी मला त्यांची पर्वाही नव्हती दिवसेंदिवस मी माझ्या कामाच्या जोरावर प्रगती करत होतो. बॉसच तर मझ्यावाचून पान हलेनास झालं होत पण त्यामूळे मि. व्हर्गीस मात्र दिवसेंदिवस अस्वस्थ होऊ लागले, कारण नसताना ते छोट्या छोट्या गोष्टिवरून ते चिडू लागले. माझ्याशी नीटपणे बोलणंही त्यांनी सोडून दिल. तसा तो माणूस स्वभावाने वाईट नव्हता गेली पंचवीस तीस वर्षे तो कंपनीत होता आणी त्याने कम्पनीची मनापासून सेवा केली होती, त्याला त्याचा लट्ठ मोबदलाही मिळत होता. पण शेवटी काहीही झालं तरी ते एक सामान्य माणूसच होते आणी त्यांच्याही मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती तीही केवळ माझ्या अस्तित्वामूळे. मी खरतर माझ काम करत होतो आणी अंगभूत हुशारीने ते अगदी चान्ग्ल्यापद्धतीने करत होतो पर्यायाने माझी चांगलीच प्रगती होत होती.

एकदा एका छोट्याशा गोष्टीवरुन मी. व्हर्गीस माझ्यावर चिडले आणी जेव्हा ती गोष्ट माझ्या डायरेक्टर च्या कानावर गली तेव्हा त्यांनिही सम्झौत्याचा सूर वापरून एकापरीने माझीच बाजू घेतली. मि. व्हर्गीसना ती गोष्ट फार लागली ते थोड़े हिरमुसले ते मला कितीतरी सिनीअर होते. आणी मुख्य म्हणजे मी त्यांना आपला स्पर्धक मानतच नव्हतो . ते मात्र आताशा माझ्याशी नीट वागु शकत नव्हते. मला सारख वाटायचं की कधी ना कधी तरी माझ त्यांच्या बरोबर जोरदार भांडण होणार आणी मी त्यांना काहीतरी बरंवाईट बोलणार. मला ते अजिबात नको होत कारण तो मानूस तसा मनाने फार चांगला होता मी त्यांच्या अशा वागण्याचं कारण शोधू लागलो आणी लवकरच एक गोष्ट माझ्या लक्षात आली ती म्हणजे माझ्या बॉस ना मी व्हर्गीससाठी पर्याय हवा होता त्यांना पूर्णपणे त्यांच्यावर अवलंबून लागत होत आणी नेमकं तेच त्यांना नको होत वरवर पाहता ते तस दाखवत नसत आणी त्यांना मी व्हर्गीस नकोच होते अशातला ही नव्हता पण तरीही कुठेतरी त्यांचा अंहकार थोडासा दुखावला जातं होता मी व्हर्गीस ना पर्याय शोध्ताना मी त्यांच्या नजरेत भरलो होतो तो स्पार्क त्यांना माझ्यात दिसला होता. मि. व्हर्गीसचं वय साधारण पन्नास पंचावन च्या दरम्यान असावं या अशा वयानं आणी कामानही

मोठ्या माणसांशी भांडायला मला खचितच आवडलं नसतं. नाही नाही म्हणता मला आता इथे तीन वर्षे झाली होती पगाराचा पण काही प्रॉब्लम नव्हता मि. व्हर्गिस्च्या खालोखाल माझाच पगार होता आणी मुख्य म्हणजे आता मला वाटत नव्हतं की नोकरी बद्लावी. इथे तिथे भटकण्यात मला तितकासा रस राहिला नव्हता. इथे मला तसा खूपच स्कोप होता.

अचानक एक चांगली ऑफर एके दिवशी मिळाली. खूपच चांगल पॅकेज होतं मुख्य म्हणजे कम्पनी नवीनच होती आणी डायरेक्टर च्या खालोखाल मीच असणार होतो . केवळ ह्या एका कारणासाठी मि लगेच तिथे जोईन झालो.माझे नवीन बॉस मि.अमरेंनी एकट्याच्याबळाव्रर चार ते पाच वर्षातच चांगली प्रगती केली होती त्यांना आता स्वताःवरचा भार थोडा हलका करायचा होता त्यासाठी त्यांनी मला घसघशीत ऑफर देऊ केली होती ही संधी मला सोडाविशी वाटली नाही माझे जूने बॉस मला सोडायला तयार नव्हते. मला ते खूपच चांगली ऑफर द्यायला तैयार झाले होते मि. व्हर्गिस्चा मात्र ती ऑफर ऐकून चेहरा साफ उतरला होता. त्यांच्या चेहर्यावर सम्मिश्र भाव दिसत होते परत सगळं कामाचा भार त्यांच्यावर येणार होता.

एका परीने त्यांना मि हवाहवासा वाटत होतो पण त्याच वेळी माझं महत्व त्यांच्यापेक्षा वाढू नये अशी त्यांची इच्छा होती. पण दोनही गोष्टी एकाच वेळी शक्य नव्हत्या मि तिकडे राहिलो असतो तर माझी प्रगती थांबणं अशक्यच होतं मी नवीन ठिकाणी रुजू झालो. हळु हळु आमची कम्पनी फार मोठ्या कंपन्यांपैकी यांपैकी एक झाली. जस्जशी वर्षे पुढे जातं राहिली तस तसा पुढे कंपनीत बराच फरक पड़त गेला अत्यन्त थोड्या स्टाफ मधली कम्पनी अनेक डिपार्टमेंटमध्ये विभागली गेली. आणी अर्थात कामाचा व्याप वाढल्यावर ते अटळच होतं. तरीही बॉसच्या खालोखाल माझाच भाव होता मी ही आता थोडा प्रौढ़ झालो होतो. मोनिटरिंग च काम करत होतो. तरूण मूल चांगली काम करणारी होती प्रत्येकाच्या कामावर मी लक्ष ठेवून होतो. आमरे साहेबही काही नवीन मुलंच कौतुक करून त्यांना प्रोत्साहन देत आणी त्यात विनय परबच नाव सगळ्यात वरती होतं. तो खरच खूप हुशार मुलगा होता त्याने वर्षभरातच आमची मर्जी सम्पादन केली होती माझी बरीच काम मी त्याच्यावर सोप्वीत असे आणी अर्थात तो ही ती लीलया पार पाडत असे. साहेबांनी पण हळूहळू त्याला चांगला स्कोप द्यायला सुरूवात केली होती पण का कोण जाणे मला मात्र त्याच्याबद्दल असूया वाटायला लागली होती. खरतर मि सिनीअर होतो आणी कंपनीत मि अमरेंच्या बरोबरीने मला मान होता बाहर मार्केट मध्ये तर त्यांच्यापेक्षा मलाच लोक जास्त मानत होते आणी नेमकी हीच गोष्ट मि. अमरेंना खटकत होती ते प्रयत्नपूर्वक आपली नाराजी लपवत असतं पण मला ती जाणवल्याशिवाय मला रहात नसे.

विनय परब नावाप्रमानेच विनयशील होता पण मी उगाचच त्याच्या कामात्ल्या त्रुटि दाखवायचा प्रयत्न करू लागलो होतो. द्वेषामुळे मी माझी सद्सद्विवेक बुद्धी गमावून बसलो होतो गम्मत म्हणजे माझ्या प्रत्येक प्रश्नासाठी त्याच्याकडे समर्पक उत्तरं तयार असायची त्यामूळे माझा जरा जास्तच जळफळाट होतं होता. मला कधी कधी वाटायचं तो माझी जागा घेऊ पाहतोय. माझ्या असुरक्शितेच्या भावनेला मि अमरे जबाबदार होते. त्यात भरीस भर म्हणजे इतर तरूण मंडळी ज्यांना विनयचा हेवा वाटत असे ती आगीत तेल ओताय्च काम करीत असतं . माझा स्वभाव दिवसेंदिवस तुसडा बनत चाल होता विनयला खाली दाखवायची एकही संधी मी सोडत नसे. मि अमरेंना ते कोणालाही आवडत नव्हतं पण माझ्या सिनीआरिटिमूळे आणि माझ्या एव्ढया वर्षांच्या योगदानामूळे ते मला काही बोलू इच्छित नव्हते.

विनयलाही कधी कधी माझा राग येत असे पण तो त्याच्यावर प्रयत्नापूर्वक नियंत्रण ठेवत असे. मला त्याच्या चेहर्यावरनं ते दिसत असे. एके दिवशी जे व्हाय्च ते झालंच विनयने तडकाफडकी राजीनामा दिला मि. अमरेनी त्याला मोठी ऑफर ही देऊ केली. मी काहीच बोललो नाही पण माझ्याचेहर्यावरची नाराजी सपशेल दिसत होती अहो तुम्ही तरी सम्जावा की याला मि अमरे मला उददेशुन म्हणाले. मी ही त्याला तोंडदेखलं समजावयचा प्रयत्न केलापंण तो फक्त हसला. त्याच्या हसण्यावरनं स्पष्ट कळत होत की त्याला माझ्या समजावण्यातील फोल पणा जाणवला होता.

मी नेहमी प्रमाणे उशीरा काम संपवून घरी चाललो होतो. माझ डोकं विचारांनी भरून गेल होत . मी विनयबद्दल विचार करत होतो खरच चांगला मुलगा होता त्याच्यावर मी बराच विसंबून होतो पण मला का कोण जाणे त्याचामूळे असुरक्षित वाटत होत. मला हेही जाणवत होत की मी त्याच्याशी तितकासा चांगला वागलो नाही. माझ मन पंचवीस तीस वर्षापूर्वी मागे गेलं, मला मि. व्हर्गीस आठवले मी खिन्न झालो आता मीच मि. व्हर्गीस झालो होतो आणी विनय म्हणजे मी. लहान्पणीनी जंगल बुक वाचताना त्यातली "जंगल का क़ानून" ही कंसेप्ट लक्षात आली नव्हती नंतर तरूण वयात त्याचा कधी विचारच केला नव्हता. परवाच टिव्हीवर जंगलबुकची कार्टून फिल्म बघितली आणी पुन्हा तो संवाद कानावर पडला." जंगल का क़ानून" म्हणजे "सर्व्हायव्हल ऑफ़ द फिटेस्ट". म्हणजे जो ताकदवान असल तोच तग धरू शकणार तुम्हाला जर जगायच असेल तर दुसरयाला मारावच लागेल.मी स्वताशी च खेदाने हसलो आपण जंगलात रहात नाही शहरात राहतो स्वताला सुसंस्कृत म्हणवतो. पण जंगल का क़ानून आपल्यालाही लागू होतो स्वताःच अस्तित्व टिकवण्यासाठी आपल्याला आप्ल्यापेक्षा जास्त शक्तिशाली व्यक्ती जवळ पास नको असते आपल्या मनात सदैव भिती असते तो आपली जागा बळकावेल.

तसा मी ओकेजन्ली पिणारा माणूस पण आज मात्र दोन पेग पोटात जाणं मस्ट होतं आणी माझी गाडी आपोआपच बारच्या दिशेने वळली . मनात एक विचार घोळत होता आपल्यापेक्षा खरतर जनावरंच बरी . .

समाप्त

---

# पाकिस्तानमधील अराजकाची बीजे कशात?

-सुधीर काळे, जकार्ता

आज पाकिस्तानात जे अराजक माजले आहे त्याची मूलभूत कारणे शोधली तर एक गोष्ट सहज दिसते की पाकिस्तानने स्वत:च्या खर्चासाठी लागणारे पैसे स्वत: कधीच कमावले नाहीत. कायम कुणा ना कुणापुढे हात पसरायचे व हातात काही ना काही पडतच राहिल्यामुळे 'कमवायची गरजच काय?' अशी स्वभिमानशून्य सवय त्या राष्ट्राला लागली व फुकटची कमाई गोडही वाटू लागली.

प्रत्येक पाकिस्तानी सरकारने अमेरिकेच्या प्रत्येक राष्ट्रपतींच्या कारकीर्दीत स्वत:चे खिसे फुकटात गरम करून घेतले. पकिस्तानचे "आद्य" हुकूमशहा फील्ड मार्शल अयूब खान यांच्या कारकीर्दीत प्रथम "सीटो" संस्थेचा सभासद म्हणून मागितलेल्या, त्यानंतर जनरल झिया-उल्-हक यांच्या कारकिर्दीत रशियाविरुद्ध लढण्यासाठी म्हणून मागितलेल्या व शेवटी जनरल मुशर्रफ यांच्या कारकिर्दीत तालिबान आणि अल् कायदा यांसारख्या दहशतवादी संघटनाविरुद्ध लढण्यासाठी म्हणून मागितलेल्या अमेरिकन लष्करी व वित्तीय मदतीचा ओघ चालूच राहिला.

नुकत्याच झालेल्या अमेरिकावारीत तालिबानशी लढायला लष्कर पाठवायला पैसे नसल्यामुळे अमेरिकेची मदत मिळेपर्यंत आपण फौज पाठवू शकणार नाही, असे निर्लज्जपणे सांगून व त्या युद्धात साधे पोलीस दल पाठवून पाकिस्तानने स्वत:चे हसेच करून घेतले. यातून असा प्रश्न निर्माण होतोच, की इतके दिवस मिळालेले पैसे कुठे गेले? अर्थातच ते भारतासारख्या शांतताप्रिय देशाविरुद्ध युद्धाची तयारी करण्यातच खर्च झाले.

पाकिस्तानने भारताबरोबरच्या वैराचा उगीचच बागुलबुवा केलेला असून भारताने टाकलेल्या अनेक चांगल्या लोकाभिमुख पावलांकडे साफ दुर्लक्ष केले आहे. उदा. अतिशय श्रीमंत व अतिशय गरीब नागरिकांतील आर्थिक दरी कमी करण्यासाठी 'कसेल त्याची जमीन, राहील त्याचे घर' अशा तऱ्हेचे कायदे घडवून आणून शेतकऱ्यांना व भाडेकरूंना भारत सरकारने दिलासा मिळवून दिला. कारखानदारांच्या पिळवणुकीला तोंड देता यावे म्हणून कितीतरी कामगाराभिमुख कायदे भारत सरकारने केले. या तऱ्हेचे समाजाभिमुख कायदे करून भारताने एक व्यापक मध्यमवर्ग निर्माण केला जो पाकिस्तान निर्माणच करू शकला नाही. आजही त्यांच्या राजकारणवर जमीनदारांची इतकी घट्ट पकड आहे की गोरगरीबांना राजकारणात शिरणे शक्यच नाहीं. त्यामुळे अतिशय गरीबीत हाल-अपेष्टा सहन करणाऱ्या जनतेला तालीबानचे आकर्षण वाटले यात नवल ते काय?

भारतात महात्मा फुले व महर्षी कर्वे यांच्यासारख्या समाजपरिवर्तन करणाऱ्या दृष्ट्यांनी भारतीय नारीला विमुक्त व सुशिक्षित करून पुढील भारतीय पिढीला अधिक सुशिक्षित व अधिक कार्यक्षम बनविले, तर "भूदान" चळवळीचे प्रणेते असलेल्या विनोबा भावेंच्यासारख्या आधुनिक संतांनी भारतात एक वेगळीच क्रांती घडवून आणली. त्यापैकी ज्योतीबा फुले "महात्मा" म्हणून गौरविले गेले, तर महर्षी कर्वे व विनोबा भावेंना भारतरत्न या सर्वोच्च पदवीने गौरविले गेले. असे कुणी पाकिस्तानात पुढे आले नाही. याउलट पकिस्तानमध्ये एका पाठोपाठ एक हुकुमशहाच जन्माला आले.

भारताप्रमाणे पाकिस्तानला आर्थिक उत्कर्ष साधताच आला नाही. उलट भारताविरुद्धच्या (नसलेल्या) वैराचे बुजगावणे उभे करून येनकेनप्रकारेण अमेरिका व युरोपीय देशांकडून त्याने जे पैसे उकळले त्यातले

बरेचसे लष्करशहांच्या खिशात गेले व जे थोडेफार उरले ते भारताविरुद्ध वापरले गेले. पाकिस्तानला आर्थिक वैभव निर्माणच करता आले नाही, पण असंख्य दहशतवाद्यांच्या टोळ्या त्यांनी उभ्या केल्या व या दहशतवादी टोळ्यांना भारतात हैदोस घालून आपल्या प्रगतीस खीळ घालण्यास मुक्त परवानगी दिली.

पण पैसे व धर्मांधता या गोष्टीवर उभ्या केलेल्या या "सैन्या"ची कुणावरच निष्ठा नव्हती. त्यामुळे ते त्यांच्या सरकारवरच उलटले व दहशतवाद्यांच्या हातातले बाहुले बनून या सैन्याने पाकिस्तानातच थैमान घालायला सुरुवात केली आहे.

भारताबरोबर वैर करून पाकिस्तानचा काहीच फायदा झालेला नाहीं, उलट अतोनात नुकसानच झाले आहे. म्हणून भारताने केलेल्या अनेक सुधारणांचे अनुकरण करून, श्रीमंत-गरीबातली दरी कमी करून, एका सुखवस्तू मध्यमवर्गाची निर्मिती करून आणि फुकटात मिळणारी मदत नाकारून स्वत:च्या पायावर उभे रहायची तयारी दर्शविली तर त्या राष्ट्राचे अजूनही कल्याण होईल.

समाप्त.

---

# <u>चाळीशी</u>

-मीनल दफ्तरदार .

चाळिशी हि चाळिशी
येण्याआधी कासाविशी
जीवाची तगमग , उरात काह्लर
निम्मं सरल्याची सारखी हुरहूर

पेला अर्धा भरलेला
कि अर्धाच उरलेला??
ठरवलं,
पाडगावकरांनाच गुरु करू
कणहण्यापेक्षा गाणंच ठेवू सुरु

भोवताल तोच , तीच मीही
पान मात्र नवं अन नवीच वही
मनाने बेट्याने टाकली कात
फिरून शिरलं तारुण्यात

चंद्र , तारे आकाशात
पुन्हा नव्याने लखलखले
फुलांचा वास घेताना
मर्ढेकरही आठवले

संपलं काह्लर
सरली तगमग
नव्या दिवसाची नवीच लगबग

आतून उसळतात आनंदाचे झरे
किंचित प्रौढ .........तरीही खरे
जगण्याची ही नवीच असोशी
चाळीशी ही चाळीशी.

# हे मृत्यो...

-अभिजित थिटे

हे मृत्यो...

असा कसा रे तू,
नको तेव्हा येणारा आणि हवं तेव्हा पाठ फिरवणारा...
कधीकधी वाटतं, साला तू माझा पक्का दोस्त,
मन अडलं, गाडं अडलं, होत्याचं नव्हतं होण्याची वेळ आली
की येऊन हलकेच माझ्या पाठीवर हात फिरवतोस
आणि म्हणतोस, 'मै हूँ ना...'
खरं सांगू, अशावेळी तुझाच आधार वाटतो बघ...
तुझ्याकडेच मन मोकळं करावंसं वाटतं
पण तूही तेवढाच चॅप्टर
जरा मोकळं व्हायला लागलं, की पाठ फिरवून निघून जातोस चक्क
कदाचित तेच प्रेम असेल तुझं माझ्यावरचं...
मला मोकळं करण्यापुरता जवळ येतोस
आणि ढग विरायला लागले, की निघून जातोस...

पण तसं नको असतं रे मला...
मला हवा आहेस तू,
मला यायचंय तुझ्या राज्यात
अनुभवायची आहे तिथली निरव शांतता,
तिथलं अगदी हलकं, पिसासारखं वातावरण...
ना आजची चिंता, ना उद्याची...
कधीकधी वाटतं उशाला घ्यावा तुझाच हात,
अगदी शांतपणे आणि विश्वासानं डोकं ठेवावं
तुझ्याच खांद्यावर...
मागच्या साऱ्या चिंता विसरून जाव्यात,
साऱ्या काळज्या सोडून द्याव्यात
आणि यावं तुझ्याबरोबर
स्वार्थीपणानं...
कान झाकून घ्यावेत घट्ट,
आपल्या माणसांनी मारलेल्या हाका ऐकू येऊ नयेत म्हणून
मन करावं दगडाचं
त्याला पाझर फुटू नये म्हणून...

काय सांगू मित्रा,
इथलं जगणं असंच आहे बघ,
दगड पडला डोक्यात, की लोकं डोक्यालाच शिव्या देतात,
माणूस सापडला अडचणीत, की त्याच्या असण्यावर,
त्याच्या वागण्यावर बोटं रोखतात

त्यापेक्षा तुझं राज्य परवडतं बघ...
मागच्यांची परवड होते थोडी,
पण ती तेवढ्यापुरतीच...
शेवटी नुकत्याच जन्मलेल्या आईच्या मुलालाही तू उचलतोसच की
तेव्हा नाही तुला काही वाटत ?
तेव्हा त्या बाळाचा विचार तरी करतोस का ?
मग आता कशाला हवा तो विचार...
अरे बाबा, लायबिलिटीज वाढवायच्या नाहीत,
हा इथला पक्का नियम...
आता मी त्या नियमात बसत नाही बाबा...
एकेकाळी अॅसेट असणारा मी आता होतोय लायबिलिटी हळूहळू
तेव्हा आपण काढता पाय घेतलेलाच बरा...

एकच सांगतो, तेवढं ऐक,
तुझी नि माझी गाठ पडणारच आहे लवकर,
तेव्हा पाठ नको फिरवूस,
आनंदानं माझं स्वागत कर आणि दे थोडी जागा तुझ्या राज्यात...
मलाही हवी आहे आता शांतता...
मलाही अनुभवू दे, ते निर्गुण निराकार रूप,
मिसळून जाऊ दे, त्या तेजाच्या घनात...
एक कण होऊ दे, त्या तेज स्तंभाचा...

---

# निकालाचा  शोध...

-अभिषेक चौधरी

अभ्यासाचा निकाल लागल्यानंतर विद्यार्थ्यांना स्वतःबद्दल बरेच 'शोध'लागतात असे आढळून येतं. तो निकाल 'result ' असेन तर बऱ्याचजणांना अमानवी शोध लागल्याचे बोलले जातं. त्यातील बऱ्याच जणांनाअसा शोध लागतो की त्यांनी दररोज १६ ते १८ तास अभ्यास केला होता.आता हा असला अभ्यास अमानवीच म्हणावा लागेन, नाही का? अहोमानव म्हटला तर त्याला ६-८ तास झोप पाहिजे, एखादा तास जेवणासलागेल, बरं विद्यार्थीदशा म्हटली म्हणजे फिरणे (हुंदडणे) आलेच. आताएवढे सगळे करून १६-१८ तास कोणी मानव कसा अभ्यास करेल. तोकिंवा ती अमानविचं म्हणायला पाहिजे. काहींना आठवते की, त्यांनीस्वतःला खोलीत कोंडून घेतले होते. काहींनी विसरलेल्या तहान-भुकेचीआठवण होते. बर अशा शोधात ह्या बहाद्दरांचे आई-बाप ही सामीलअसतात. नव्हे तर ह्या शोधांची घोषणाच आई-बापच करतात. मगमाझ्यासमोर हिंदी चित्रपटाचा एक scene उभा राहतो. शक्यतो नायकहातात पुस्तक घेऊन अभ्यास(?) करत असतो आणि त्याची आई त्याला'गाजर का हलवा' नाही तर 'मुलीं(मराठीतील मुळे, नाहीतर वेगळेचसमजाल) के पराठे' खाऊ घालत असते. काय एकेकाच्या आया, नाही?नाहीतर आम्ही अभ्यासासाठी कायम आईच्या हातचे 'धपाटे' खाल्ले,आणि वर 'तोंडातून आवाज काढायचा नाही' असा दम पण खाल्ला. आता'धपाटे' खाल्यावर धड स्तुती सुद्धा करू देत नाहीत! काय एकेकाच्याआया, नाही?

काही शोध विलक्षण धक्कादायक असतात. आता हेच बघा ना, एक मित्रएक मोठी परीक्षा पास झाला. आता ह्याला वरीलपैकी एकही शोधलागला नाही. त्याला तिसराच शोध लागला की, "त्याने म्हणे अभ्यासचकेला नव्हता", आता बोला!! आता हा अभ्यास न करताच पास होतो तरमग आम्ही काय झक मारली होती. ह्याच्या अशा विलक्षण शोधामुळेआमची मात्र पुरती भंबेरी उडाली कारण ह्याने आपली अभ्यास चिकित्साआमच्या आऊसाहेबांनाही सांगितली. मग काय ह्यला लाचरुपी बक्षीसदेऊन विनंती करावी लागली "सांग न लेका अभ्यास केला म्हणून,आमची कायले गोची करून राहिला!"

आता या उलट अभ्यासाचा 'निकाल' लागणाऱ्यांची तर कथाच निराळी!काय आणि कसे सांगू हो तुम्हाला? तुम्हाला म्हणून सांगतो, फारअवघड असतो हो... पण अशा हलाखीच्या परिस्थितीत पण शोधलावण्याचे स्पिरीट कायम असतं बरंका!! परीक्षेच्या दिवशी एकाधीरगंभीर झालेल्या मित्राला विचारले, "काय राजे कसा गेला पेपर?"तर एकदमच कोल्हापुरी शिवी हासडून ओरडला, "रांडीच्या पेपरकाढणारयाचे बायकोशी भांडण झालेलं दिसतंय. बायकोनं काढला असेन ह्याला घराबाहेर आणि त्यो राग आपल्यावर निघाला!" त्याचा निकालबहुतेक त्याच दिवशी कळला होता बहुदा. बघा म्हणजे विद्यार्थीदशेतचशोधाचे तर्कशास्त्र किती विकसित होते ते. केवळ प्रश्न वाचून अगदी उत्तरेयेत नसताना हा राजा direct परीक्षकाच्या घरात घुसला. विलक्षण आहे!

असे बरेच विलक्षण शोध लागत असतात. काहीना पेपर 'out of syllabus ' असल्याचा शोध लागतो तर काहीना आपली जोडलेलीपुरवणीच हरवल्याचा! बरीच जण तर एकदम TRANS मध्ये जाऊनआत्म्याचा शोध लावतात. अशाच शोधसत्रामध्ये एका मैत्रिणीला पण(!)शोध लागला. "निकाल काही पण असो, आपण परीक्षा देतो म्हणजेआपण लै 'भारी' आहोत." आता निकालावरून वजन कळण हा शोधचम्हणा की! असले शोध मला फक्त वजनकाट्याचा काटा ९९ च्या पुढे गेलाकी लागतात. असे भारी भारी शोध लावण्याची माझी फार इच्छा आहे. 'मी १६ तास अभ्यास करतो', 'पहाटे ४ वाजता उठून अभ्यास करतो', 'रोज एक तास ध्यान लावतो' इत्यादी इत्यादी. पण आमचे शोध बघणार कोण? त्यासाठी 'निकाल' लागलेला चालत नाही, चांगला 'result ' लागतो! आता त्यासाठी आधी पुस्तकांचा शोध घेतो...

## १.काही चारोळ्या

तुझा निरोप घेताना
आसवांनी खूप गर्दी केली होती...
खूप हायसं वाटलं होत तेव्हा,
गर्दीत हळूच हरवून जाण खूप सोप्प असत!!

मुकेपणातच स्फुंदत होतीस सखे,
निदान शब्दांना तरी बरोबर घ्यायचेस
आसवांनी सांडलेल्या अगतिकतेला
आजकाल खूप कमी भाव मिळतो म्हणतात!!

ओठांमध्ये अडली होती वेदनेची गाणी
पापणीत दडले होते सुने सुने पाणी
आभाळही उन्मळून फाटलेले होते
निरोपाचे क्षण उभे ठाकलेले होते

ओठांनी ओठांना तेव्हा सावरायचे दिवस...
मिठीतल्या मिठीत तेव्हा शहरायचे दिवस...
वाटेवर तुझ्या डोळे मिटायचे थकून
आसवांनी नकार हळूच सांडायचे दिवस!!

---

---

## २.सांजगुंफण

सांज जाते निष्ठुर बनून
दूरवर गडद होऊन
सावल्यांच्या अफाट गुंत्यात
हळुवार!! अल्लद सोडून!!

सांज जाते निष्ठुर बनून
दाट छाया नाचती भेसूर
गात्र सांडे स्फुंदत स्फुंदत
श्वास..पाठी.. अर्धे सांडून!!

सांज जाते...नको वाटते...कातरवेडे झुरणे
सांज जाते...नको वाटते...पाठवणीचे रडणे!!
सांज जाता...भरून येती...ठसठसणाऱ्या कळा
सांज जाता...दाटून येती...चुकामुकीच्या वेळा!!

---

---

## ३.निरोपाचे दान

पाउलवाटेने नसते पहायचे मागे वळून
दु:ख ढाळत असताना,
हळूच घ्यायचे असतात आसू कोरडे करून
शहाण्या वेळा असतात कधी कधी अर्थमय सखे
टाकून द्यायच्या असतात
फुलांच्या अस्वस्थ अस्थी सहजतेने तर्पण करून..

माझ्या साऱ्या वेदनांना मलाच साथ द्यायची आहे
सांज मावळत असताना,
घरट्याच्या उबेत कातरवेळच जवळ घ्यायची आहे!!!
शहाण्या वेळा असतात कधी कधी अर्थमय सखे
विरक्त व्हायचे असते
रेशीमगाठींच्या पाशाचे मोह अलगद सोडवून

आता देऊनच टाक निरोपाचे दान आली आहेस तर
सावल्या आहेत उभ्या,
दूरवर जाऊन मावळणाऱ्या संधीमग्न तीरावर
शहाण्या वेळा असतात कधी कधी अर्थमय सखे
विरून गेलेल्या माणसांना
द्यायची असते तिलांजली,
पाऊल वाटेवर मागे न बघता वळून!!!

---

-रोहित कुलकर्णी

---

# पाऊस

-कल्पी जोशी

पाऊस आठवाचा
पावसात न्हाला
घेउन आसवांना
पापण्यात ओला

सल सलते कधीची
गेलेल्या क्षणांची
ती वाट दुर गेली
प्रितीच्या खुणांची

मी एकटीच आहे
भर पावसात रिती
उसवुन आसवांना
फ़सवीच सारी नाती

पाऊस रडवेला
माझ्याच अंगणात
मी कोरडीच आहे
माझ्याच अंतरात

किती काळ मी भिजावे
नभास नाही ठाव
माझ्याच आसवांनी
का चिंब झाले गाव

# एक किनारा .......!!

-माया कुलकर्णी

आठवते तो कोकण...??
ती नारळाच्या झाडांनी
ठीक-ठिकाणी केलेली गर्दी.

समुद्राच्या काठी आपण दोघं,
ओल्या रेतीवरून हातात हात धरून
पावलांच्या खुणा करत-करत,
दूर-दूर पर्यंत चालत गेलेलो.

जगाच्या त्या कुठल्यातरी टोकावर
जन्मो-जन्मी सोबत राहूत.
म्हणून विश्वासाने जीवनाची एक पाऊलवाट
सुरु केली होती त्या रेतीतून.

तो सांज गारवा,त्या लाटांचे अंग भिजवणे.
आणि थंडीने कुड कुडत जाऊन,
मस्तपैकी दूर खडकावरती बसून,
त्या मावळत्या दिनकराची,
काया निरखत बसलेलो.

सगळ काही....,
अगदी स्वच्छंदी मनाने अनुभवत होतो आपण.
आणि तो निसर्ग हि प्रेरणा देऊन गेला
हे जीवन कसं जगायचं ते,
हो ना रे..??

जिथे फक्त तू आणि मी....,
आणि लाटांचा खळ-खळनारा आवाज.
सूर्याचे ते लालेलाल रूप लाजून,
ढगांच्या च्या कुशीत शिरतांना,
आपली हि मनं कशी कावरे-बावरे झालेली.
नाही का....??

# मसीहा

-अशुतोष मोहरीर

गालावरच्या लुसलुशीत ओल्या स्पर्शाने त्याला जाग आली.
किलकिले डोळे उघडून पाहतो तर एक कुत्र अगदी तोंडापाशी येऊन उभं होतं.
"हट!!" म्हणत तो उठला
पाहतो तर भोवती आणखी दहा बारा कुत्री.
हा उठून उभा राहताच सगळी गुरगुरायला लागली.
धडपडत तो मागे सरकला तर तशी कुत्री अंगावर यायला लागली.

तेवढ्यात कुठूनसा एक दगड कुत्र्याच्या दिशेनी आला एक कुत्र पेकाटात पळत सुटलं
ह्यानी मागे वळून पाहिलं तर एक म्हातारा हातात आणखी एक दगड घेऊन उभा होतां.
"बघतोस काय? दगड हाण ना, नाही तर तुला फाडून खातील ती...ए ह्याड...ह्याड"

अज्ञाधारका प्रमाणे त्याने भराभर आजू बाजूचे गोटे उचलून कुत्र्यांवर फेकायला सुरुवात केली.
दोनच मिनिटात सगळी कुत्री पसार झाली आणि त्यानी सुटकेचा श्वास सोडला.

म्हातारा त्याच्या जवळ आला, त्याला नीट न्याहाळत म्हणाला.
"काय नाव तुझं? किती रक्तानी माखला आहेस बघ. काय झालं? इथे कसा आलास"

आयला!!
त्यानी दोन्ही हातानी डोकं गच्च धरलं.
प्रश्न अगदी सोपे होते, पण....
काही आठवतच नव्हतं...

कोण मी? इथे कसा आलो?

नाही!, काहीच आठवत नाहीये.

"बहुतेक तू वरून पडला असशील" म्हातारा वर बघत म्हणाला.
पाहतो तर वर रेल्वे चा ब्रिज होतां.

"वाचलास, जरा इकडे पडला असतास तर मेला असतास. नदी बघ कशी दुथडी भरून वाहते आहे"

बापरे!!
प्रचंड मोठं पत्र असलेली नदी होती, म्हातारा म्हणतो ते बरोबर आहे. जरा बाजूला पडलो असतो तर प्रेत सुद्धा सापडलं नसतं

"काय नाव म्हणालास?" म्हाताऱ्याने पुन्हा विचारलं

"मला काहीच आठवत नाहीये हो" केविलवाणा होतं तो म्हणाला.
डोक्याला मागे फार मार बसला होता, आता ते ठणकायलाही लागलं होतं

म्हाताऱ्याचा चेहरा विचारमग्न झाला. तो तसाच मागे फिरला.

रक्तानी अंग चिकट झाले होते, कपड्यांना पण मोठा डाग लागला होता.
जरा तोंड धुवून घ्यावे म्हणून तो नदीच्या काठापाशी गेला

"फार समोर जाऊ नकोस, पडशील" मागून म्हाताऱ्याचा आवाज आला

"बरं" तो पुटपुटला
त्याला म्हाताऱ्याच्या आगाऊ पणाचा खूप राग आला
साला, लहान समजतो का मला?

"अरे, तू ऐकत नाहीस का माझं? घरी पाठवुन देईन"

घरी?
मग लक्षात आलं, हा मला म्हणत नाहीये.

एक सात आठ वर्षाचा मुलगा नदीच्या काठावर उभा होता.
हातातल्या काठीनी वाकून काहीतरी काढत होता.

"आजोबा इथे एक बॅग आहे"

"असू दे, काही नसणार त्यात. लोक आपली बॅग उगीच अशी नदीत फेकतात का?"

"पण मला ती काढायची आहे"

"नको, उगीच काहीतरी निघायच त्यातून. तू तिथून दूर हो आधी"

"येवढी तर जवळ आली आहे. पटकन निघेल"

"जिद्दी आहे" म्हातारा हताश होत म्हणाला "माझ्या मुलाचा मुलगा आहे हा"
म्हाताऱ्याने गरज नसताना सांगितल.

"असू द्या हो, लहान आहे"
हा काहीतरी बोलायचं म्हणून बोलला

"बरोबर आहे, तो मुंबईत असतो, सुट्टी म्हणून आजोळी आला. तिकडे त्याला असं खेळायला कुठे मिळणार?"

"हो बरोबर"

"पुण्या-मुम्बईची पब्लिक सुट्टीमध्ये हिलस्टेशनला जाते. हा आपल्या आजोबाकडे आला. आता या छोट्याश्या गावात करमणुकीची साधन तरी किति असणार म्हणा"

दोघ एकमेकांकडे पाहून हसले.

तेवढ्यात "आजोबा..." अशी किन्काळी आली

काठाकडे पाहतो तर...

"अरे देवा!" म्हातारा एकदम रडायला लागला

काठावर कोणीच नव्हतं.

त्याचा नातू नदीत पडून गटांगळ्या खात होता.
पाण्याच्या फोर्स मुळे वाहत जात होता

"वाचवा रे कोणीतरी त्याला" म्हातारा याच्या समोर हात पसरून रडायला लागला

यानी मागचा पुढचा विचार न करता सरळ पाण्यात उडी मारली.

काठाजवळ असल्यामुळे पाणी खोल नसलं तरी पाण्याला ओढ होती.
बरीच ताकद लाऊन त्याने शेवटी म्हाताऱ्याच्या नातवाला बाहेर खेचला.

पोरग सुखरूप होतं, पण भेदारलं होतं.
म्हतार्यानी त्याला पोटाशी घेतलं.
"याला उगीच इकडे घेऊन आलो, माझंच चुकलं" म्हणत म्हातारा हमसून हमसून रडायला लागला.

यानी समोर होत त्याला धीर दिला.
थोड्या वेळानी म्हातारा शांत झाला.
"मी तुझे उपकार कधीच विसरणार नाही. माझा मुलगा शहरात मोठा डॉक्टर आहे. तुला काही आठवत नाहीये ना? तो मदत करेल. आजच तो मुंबईहून येतोय, याला परत न्यायला. तू माझ्यासोबत माझ्या घरी चल"

"आजोबा, उपकार अजिबात मानू नका, मगाशी तुम्ही सुद्धा मला कुत्र्यांपासून वाचवलत ना? मी इथेच थोडा वेळ शांत बसतो, मला आठवेल सगळं हळू हळू"

म्हातारा समाधानानी हसला
"तू कोण आहेस हे मला ठाऊक नाही. पण माझ्यासाठी तू नक्कीच मसीहा आहे मसीहा"

म्हातारा नातवाला घेऊन निघून गेला.

शांत, एकांत आणि विचार.
कोण असेन मी?
मलाही परिवार असेल. त्या पोरा एवढ मलाही एखाद पोर असेल.

कोण मी?

माणूस? मसीहा?

मसीहा!
त्याला स्वतःचेच असु आले

थोडा वेळ तो नदीच्या पाण्याकडे टक लाऊन बघत बसला.

लांबवरून ऐकू येणाऱ्या रेल्वे च्या भोन्ग्यानी त्याची तंद्री भंगली.

लांबवरून त्याला येणारी गाडी दिसत होती.
गाडीत म्हाताऱ्याचा मुलगा असेल कदाचित. मुलाला सोबत घेऊन जाईल.
बिच्चारा म्हातारा! त्याचं मन त्याला किती खात असणार.
घडलेली घटना सांगू शकेल तो आपल्या मुलाला?

वेगानी गाडी ब्रिज जवळ आली तसा हा उठला मागे फिरून जाऊ लागला
तेवढ्यात...
प्रचंड आवाज....

कानठळ्या बसवणारा...

त्यानी मागे वळून पाहिलं, गाडी ब्रिज सोडून वेगानी खाली उतरत होती, इंजिन गाडीला नदीच्या पत्राकडे घेऊन चालले होते

बापरे!
तो अवाक होत पाहत होता.

ट्रॅक सोडून गाडी चे डब्बे उलट पालट होत इंजिन च्या मागे फरफटत चालले होते

प्रचंड आवाज.... लोकांच्या किंकाळ्या.

त्याने सहन न होऊन कान बंद केले.
डोळे गच्च मिटले.

केवढा हा अनर्थ !

काय रे देवा, का इतक्या निष्पाप जीवांचा बळी घेतलास?

थोड्या वेळानी प्रचंड आवाज बंद झाला
ऐकू येत होत्या त्या नुसत्या किंकाळ्या आणि रडणे.

त्याने डोळे उघडले, अर्ध्याहून जास्त गाडी नदीच्या पत्रात होती. खोल भागात तर डब्बा पूर्ण बुडला होता.

देवा!! देवा!
किती लोकं मेली असतील कोण जाणे.
म्हाताऱ्याचा मुलगा?

नको रे देवा असं करूस.

तेवढ्यात त्याला मंड्यापाशी काहीतरी जाणवलं.
मगाशी पाण्यात किडा वगैरे शिरला की काय

त्यानी खिशात हात घातला.
बघतो तर प्लास्टिक मध्ये काहीतरी गुंडाळले होते
काढून पाहिलं तर मोबाईल फोन.

कोणी तरी कॉल करीत होतं.

त्याने थरथरत्या हातानी फोन घेतला
"हेल्लो"

"गाडी घसरली ?" समोरून घोगर्या आवाजात कोणीतरी विचारलं
हा एकदम अवाक!
"हो"

"खूप लोकं मेले असतील नाही?"

"हो"

"तरी हजार एक?"

"हो"

"शाब्बास! मला माहित होतं तू कामगिरी फत्ते करणार. आमच्या ग्रुप मध्ये तू नवा होतास, पण तुझ्यात धमक होती म्हणून ही कामगिरी तुला दिली. वा रे मेरे शेर. मुबारक हो. आता आपल्या संघटनेची पुन्हा एकदा जरब वाढेल. तू लगेच इकडे चालला ये. तुला मोठे बक्षीस मिळेल. अरे अश्या बऱ्याच कामगिरी करायच्या आहेत तुला"

त्याने फोन कट केला

विषण्ण मानाने तो नदीच्या पत्राकडे बघत होता
गाडीत अडकलेले काही जखमी लोकं खिडकीतून हात पसरून मदत मागत होते...

---

# मायी माय आन त्याची मम्मी

-सुनील जोशी

मायी माय आन त्याची मम्मी
अलग अलग घराईतल्या जरी
एकसारख्याच नशिबाच्या परी
दोन बायाईची एका ही कहानी

मायी माय पडली गरीबा घरी
घासे भांडी आन धुये धुनी
रईसाघरी तसी त्याची मम्मी
किट्टी पार्टी आन खेले रम्मी

माहा बाप्पू लावे रोज आकडा
आन सोबत लावे देसिचा तड़का
आकडा हुकला आन देसी चढली
का बाप्पू ले दिसे बदडायले माय

मार खाऊ खाऊ लय लड़े माय
म्हने बाबू लय दुकते रे अंग मायं

त्याचा पप्पा रेस चा शौक़ीन
सोबत मिस आन इंग्लिस वाईन
रेस चा घोड़ा हारला का मंग
पप्पा बसे रातभर मिस आन वाईन
बसे बोम्बलत मम्मी म्हनत म्हनत
लुट गयी रे मै हुआ कैसा ये गलत

थोडक्यात काय

माय ले बसे लाथाईचा मार
आन दुकत रहे तिचं सारं आंग
मम्मिले भेटे शब्दाई चा मार
आन होत रहे थे बी तंग ....

असाच राह्यते बावा ह्या बापा पप्पाच्या दुनियेत
असो मायी माय का राहों त्याची मम्मी
अलग अलग घराईतल्या जरी
एकसारख्याच नशिबाच्या परी
दोन बायाईची एका ही कहानी

# थर्ड आय

विनायक पाचलग

"मला 3 Idiots संपूर्ण अगदी फ्रेम टू फ्रेम आवडला" अर्थात, बर्याच जणांना माझे हे विधान अतिशयोक्त वाटेल, नव्हे ते आहेच.पण हेच सत्य आहे.अहो, सचिनच्या सर्वोत्कृष्ट इंनिगमध्ये एखादा बॉल त्याला खेळायला जमलेला नसतोच की! तसा एखादा दोष इथेही आहे, पण बाकी, ऑल ईज वेल. महत्त्वाचे म्हणजे या चित्रपटाने समाजात जी चर्चा घडवली त्यामुळे तर तो मला आधिकच आवडतो. हां, आता तुम्ही म्हणाल की काय हे पुराण लावलय, दिसेल तिथे 3 Idiots वरचे लेख वाचून आम्ही कंटाळलोय आता! बरोबर आहे, पण वाहत्या प्रवाहात हात धुवुन घेणारा हा लेख नाही आहे. या सगळया मधल्या काळात झालेल्या चर्चात वगैरे अनेक मुद्दे समोर आले. नकळतपणे अनेक बेसिक प्रश्नावर चर्चा झाली आणि, त्यासाठीच हा सगळा धुरळा खाली बसल्यानंतर, म्हणजे आता, काही गोष्टीवर खरीखुरी, सांगोपांग चर्चा करण्याची,पुर्वी मांडलेली मते योग्य होती का? हे तपासण्याची वेळ आलेली आहे.

तसं, बघायला गेलं, तर 31 डिसेंबरपर्यंत सगळ ऑल इज वेलच चालु होतं. पण त्याचदिवशी चेतन भगतने त्याच्या ब्लॉगवर एक पोस्ट टाकली, आणि ठिणगी पडली. बाकी मग मिडियाने त्यात तेल घालणे . नंतर चेतनची माघार. इ. इतिहास तुम्ही जाणताच. पण मला खरे खरे सांगा मित्रांनो, तुम्हाला फाईव्ह पॉइंट समवन पेक्षा 3 Idiots सरस वाटत नाही का ? मला स्वत:ला तरी असे वाटते की,चेतनला आपल्या पुस्तकातुन जे सांगायचे होते, ते चित्रपटातून जास्त प्रभावीपणे मांडले गेले. पुस्तकं वाचताना शेवटपर्यंत आपल्याला त्यातला संदेश हुडकावा लागतो. पण, चित्रपटात "कायमाबी के नही, काबिलियत की पीछे भागो" हा संदेश सतत अंडरलाईन होतो. मनावर बिंबतो .हा! याला तुम्ही चित्रपट या माध्यमाची ताकद म्हणू शकता. पण,ते तसे नाही आहे, तसे असते तर "हॅलो" सुपरहिट झाला असता. कादंबरीची कथानकाच्या दृष्टीने बदल करणे, नवीन पात्रे इ. बाबतीत जे उत्तम बदल केले गेले. त्यामुळे, पुस्तकाच्या 100 पट नवीन पटकथा उत्तम झाली आहे . कदाचित,यासत्याची जाणीव झाल्यानेच आपले या कथेबाबतचे अस्तित्व रहावे यासाठी चेतनने हा वाद केला असावा.पण माझ्यासारख्या त्याच्या खर्या चाहत्याना मात्र असेच वाटते की त्याने असे करायला नको होते ,कारण आपलाच मुद्दा एखादी व्यक्ती अतिशय प्रभावीपणे इतरांपर्यंत पोहोचवत आहे ,तीही आपल्याच परवानगीने ही कोणत्याही लेखकासाठी अभिमानाची आणि आनंदाची गोष्ट असते. असो, शेवटी चेतन ने निदान माफी मागण्याचे तरी शहाणपण दाखवले. काही लोकांना हा मुद्दा Publicity Stunt वाटला. पण तो तसा स्टंट नाही म्हणून आमिरने त्यावेळी घेतलेली "आत्ताच काही बोलणार नाही" ही भूमिका खरंच कौतुकास्पद आहे. त्यामुळे,या सगळ्यासाठी आमिर आणि 3 Idiots चे मराठी लेखक अभिजीत जोशी यांचे अभिनंदन केलेच पाहिजे.

हा वाद संपतोच ना संपतोय, तोवर देशभर आत्महत्या सत्र सुरू झाले, आणि काही जणांनी याचे खापर 3 Idiots वर फोडले. जसा पूर्वी "एक दूजे के लिए" आत्महत्येला कारणीभूत ठरला. तसा, यातील प्रसंगामूळे मुले आत्महत्या करत आहेत, उद्युक्त होत आहेत. असे म्हणले गेले, असेलही कदाचित. पण, फ्रेंडस आपला बघण्याचा ऍंगल थोडासा बदलुन बघा बर! 3 Idiots मुळे मुलांना प्रेरणा मिळाली हे मान्य, पण आत्महत्येचा निर्णय काही एका रात्रीत होत नाही. याचा अर्थ, एवढी मुले आतल्या आत मानसिकदृष्टया मेले

ली होती, त्याचे काय? आज भारतात केवढया मोठया प्रमाणवर लहान मुले वेगवेगळया दबावाखाली झुरताहेत,जळत आहेत त्याचे एक विदारक चित्र या चित्रपटामुळे आपल्या समोर आले. त्याह्नन खेदाची बाब म्हणजे, त्यानंतर आलेल्या चर्चेच्या, लेखांच्या उधाणात या मुळ गोष्टीवर चर्चा झालीच नाही. झालीच तर दुर्लक्षीत राहिली. पण, शिक्षणपध्दती ,नातेसंबंध असे बेसिक प्रश्न ज्यामुळे कोवळया कळया खुडल्या जात आहेत. त्यावर उहापोह नको व्हायला? या सर्वांवर काही लाँग टर्म उपाय करायला नकोत का? बघा, तुम्हाला काय वाटतंय ते?

असेच काही प्रश्न त्यातली रँगिंग, बलात्कार भाषण आणि गर्भारपणाचा प्रसंग यावर उठवले गेले. हे प्रसंग जास्तच ताणलेत, किंवा हे जरा अती होतयं, असं काहीसं मत अनेकांनी व्यक्त केलं! होय, ते थोडसं अती झालयं. पण, त्याची परिणामकारकता मात्र प्रचंड होती. चित्रपटात दाखवलेले प्रसंग काही अमानवी किंवा अकल्पित नव्हते,असे छोटेमोठे प्रसंग सगळीकडेच घडतात. रँगिंगचा 3 Idiots मध्ये वापरलेला प्रकार तर बराच प्रसिध्द आहे. फक्त या आतल्या गोष्टी पहिल्यांदाच चव्हाटयावर आल्या.त्यामुळे थोडा त्रास झाला इतकेच. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे बाळंतपणाचा प्रसंग. या प्रसंगानं काय दाखवून दिलं. तर आपला बघण्याच दृष्टीकोन किती फरक पाडू शकतो ते!! प्रख्यात मराठी लेखक "शाम मनोहर" यांच्या "उत्सुकतेने मी झोपलो" मध्ये एक पात्र म्हणते, की चित्रपटात मानवी जीवनातीले सर्व टप्पे घेतली जातात, पण बाळंतपणाचा टप्पा काही घेत नाहीत.कडु असले तरी हेच सत्य होते! अश्लीलता, व्हल्गरपणा यायच्या भितीनं मानवी जीवनाचा अत्यंत महत्वाचा भाग, घटना चित्रीत करणं, सगळयांनीच आजपर्यंत टाळलं होत. मात्र, प्रस्तुत चित्रपटात याचं चित्रण तर केलं गेलचं. पण या सर्वांत अश्लीलतेचा स्पर्शही नव्हता आणि, तरीही ते किसळवाणेही वाटलं नाही. एक अवघड प्रसंग, पाय घसरायच्या अनेक जागा असताना अतिशय सुयोग्य पध्दतीने मांडल्याबद्दल उलट मी दिग्दर्शकाचे अभिनंदनच करीन. कारण जे भारतीय समाजात दाखवणे जवळ जवळ अशक्य होते ते त्यांनी करुन दाखवले.तुम्हालाही असे वाटत नाही का?

शेवटी कसं आहे, एखादी घटना आपण बघतो तशी आपल्याला दिसते. मी काही आमिर खानचा प्रसिद्धी प्रमुख नाही आहे की या चित्रपटाबद्दल इतके चांगले बोलत आहे . पण हा असा चित्रपट आहे की जो आत्तापर्यंतचा सर्वातप्रसिद्धचित्रपटआहे .त्याह्नन महत्त्वाची गोष्ट म्हणजे जेव्हा करोडो लोक असा चित्रपट बघतात तेव्हा प्रत्येकाचा पाहण्याचा नजरिया ,समजायचा नजरिया वेगळा असतो .कुणाला यातल्या संदेशामुळे नवी उमेद मिळते तर कोणी त्यातली आत्महत्याच तेवढी घेतो. आणि मग इथे प्रश्न निर्माण होतो ,काय घ्यायचे ,एखाद्या कलाकृती कडे कसे पाहावे ,निदान कसे पाहणे समाजाच्या दृष्टीने हिताचे ठरेल इ. आणि याला उत्तर शोधावेच लागतेआणि ती नजर स्विकारावी लागते. पाण्याने भरलेला अर्धा ग्लास आहे, कुणाला तो ग्लास अर्धा भरलेला दिसतो. तर कुणाला अर्धा रिकामा. मी 3 Idiots पाह्नन "बाबा रांछोडदास की जय" म्हणेन. तर कोणी हट! काय बोगस चित्रपट होता. फरक नजरेचा असतो. आपला दृष्टिकोन बराच फरक पाडू शकतो हेच आपण विसरलो होतो. त्याची जाणीव पुन्हा या चित्रपटाने करून दिली, इतकेच. बाकी, एखाद्या घटनेकडे पाहण्याचा ऍंगल बदलणे हेसुध्दा त्या प्रश्नाचे उत्तर असु शकते नाही का? काय म्हणता.....?

==========================================================================
==========================================================================